

ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविदयालयामध्ये क्विकहिल फाऊंडेशन ( QUICKHEAL FOUNDATION) च्या माध्यमातून सायबर सुरक्षा जागरुकता कार्यक्रम दि. 8 सप्टेंबर 2022 रोजी महाविद्यालयातील पंतजलि सभागृहामध्ये घेण्यात आला. सायबर सुरक्षा गरजेची का आहेत?,सायबर सुरक्षा म्हणजे काय ?त्याचे प्रकार, सामाजिक माध्यमांचा योग्य वापर, सायबर गुन्हयाचे प्रकार, गुन्हा घडल्यास संपर्क आणि तक्रार नोंदणी, सामाजिक माध्यमे वापरताना काय करावे व काय करू नये तसेच आपले इंस्टाग्राम व फेसबबुक खाते कसे सुरक्षित ठेवावे अश्या गोष्टीची माहिती सायबर सुरक्षा योद्धा अश्लेषा भोसले आणि श्रेयस पालकर यांनी अत्यंत सुंदर पद्धतीने विदयार्थ्यापर्यंत पोहचवली. काही विद्यार्थ्यांनी देखील त्यांचा अनुभव सांगितला, तसेच विद्यार्थ्यांनी शंका देखील विचारल्या व त्याचे निासन अश्लेषा व श्रेयस यांनी उत्तम रीतीने केले. उपस्थित विदयार्थी व शिक्षकवर्ग यांनी मिळून सायबर सुरक्षा शपथ देखील घेतली. संपूर्ण कार्यक्रमाचा सारांश म्हणून शेवटी एक ध्वनीचित्रफित दाखवली गेली. सदर कार्यक्रम प्राचार्य कॅप्टन डॉ मोझेस कोलेट यांचे मार्गदर्शन लाभले , उपप्राचार्या सौ. सुनिता ढाकणे मॅडम, क्विकहिल फाऊंडेशनच्या रेणुका मॅडम, प्रा. अनिल आठवले सर, प्रा. बिपिन धुमाळे सर इत्यादींचा हा सहभाग लाभला सदर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने संपन्न झाली.